जनसंपर्क कक्ष

0 5 MAR 2021 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहू संशोधन केंद्रातर्फे उद्या ग्रंथांचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील शाहू संशोधन केंद्रातर्फे दोन ग्रंथांचे प्रकाशन उद्या, शनिवारी (दि. ६) सकाळी अकरा वाजता विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात ज्येष्ठ लेखक लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत.

यावेळी या संशोधन केंद्राचे संचालक डॉ. जयसिंगराव पवार यांनी संपादित केलेल्या 'शाहू छत्रपती : राजा आणि क्रांतिकारक' आणि 'राजर्षी शाहू छत्रपती आणि कोल्हापूर चळवळ' या ग्रंथांचे प्रकाशन होईल. न्यायमूर्ती जी. एन. वैद्य यांच्या व्याख्यानांची मराठी आवृत्ती 'शाहू छत्रपती : राजा आणि क्रांतिकारक' हा ग्रंथ आहे. त्याचे अनुवादक प्रा. चंद्रकांत गायकवाड आहेत.

मद्रास विद्यापीठातील डॉ. चंद्रा मुदलियार यांच्या व्याख्यानांची मराठी आवृत्ती 'राजर्षी शाहू छत्रपती आणि कोल्हापूर चळवळ' हा ग्रंथ असून, त्याचा अनुवाद प्रा. दिलीप पंगू यांनी केला आहे.

Times of India

# E-waste & recycling wing started in Kolhapur varsity

**Rahul.Gayakwad**
@timesgroup.com

Pic for representational purpose only




The idea came up during an online lecture series organised by the electronics department

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) has started an e-waste and recycling wing on the university campus in view of the increasing pollution created by electrical equipment.

The idea came up in an online lecture series organised by the electronics department on 'Green Electronics' recently where renowned lecturers across Maharashtra shared their thoughts on the concept of electronics and the environment.

Professor Dr M.K. Bhanarkar, the coordinator of the online lecture series, said, "Rising heap of E-waste has become a threat for the society. Electronic waste contains plastic and other hazardous content and people throw away the e-waste in open, which is burnt with other garbage and produces toxic emissions."

"Keeping this in mind, the electronics department has established an E-waste and recycling wing, where the e-waste will be collected at one single place and then will be handed over to e-waste recycler by signing a Memorandum of Understanding (MoU). This wing will be operated by students and the money received will be given to students as a stipend thus helping them in the 'Earn while you Learn' scheme.

Dr P.N. Vasambekar, the head of SUK's electronics department, said, "After getting permission from chancellor D.T. Shirke and the vice-chancellor P.S. Patil, the e-waste wing has been started in the Electronics department on an experimental basis. This centre will need support from the electronics, environment, Geography, chemistry, statistics, technology, education and other departments to ensure this concept works properly. Such kind of e-waste centre has been started for the first time in a university in Maharashtra."

तरुण भारत

# डॉ. जयसिंगराव पवार संपादित दोन ग्रंथांचे प्रकाशन उद्या

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील शाहू संशोधन केंद्राचे संचालक, ज्येष्ठ शाहू संशोधक डॉ. जयसिंगराव पवार संपादित दोन ग्रंथांचे प्रकाशन शनिवार ६ रोजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात आहे. प्रकाशन माजी जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी आहेत. प्रकाशन सोहळ्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी केले.

पुण्यनगरी

# शाहू महाविद्यालयात विज्ञान दिन उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयात विज्ञान दिनाचे औचित्य साधून सायन्स प्रश्नमंजूषा स्पर्धेचे संयोजन सायन्स असोसिएशनतर्फे करण्यात आले. ही स्पर्धा स्ट्रेट फॉरवर्ड, बझर राऊंड व राऊंड फायर प्रश्न या तीन प्रकारात घेण्यात आली. विज्ञान विभागातील विद्यार्थी स्पर्धेत सहभागी झाले होते. उद्घाटन शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाचे डॉ. एस. एन. तायडे यांनी केले. अध्यक्षस्थानी डॉ. जी. बी. कोळेकर होते. प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपक्रमासाठी डॉ. एस. व्ही. पाटील, डॉ. आर. एस. डुबल, डॉ. व्ही. व्ही. किल्लेदार, डॉ. समाधान पवार, प्रा. श्रीमती माळवेकर, प्रा. एस. एम. गोजारे, प्रा. श्रीराम शिंदे, डॉ. तेजस्विनी कुरणे आदी प्राध्यापक व शिक्षकेतर सेवकांचे सहकार्य लाभले. प्रास्ताविक डॉ. किशोर गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. प्राची बोटे व स्नेहा कोपर्डे यांनी केले. उपक्रमासाठी प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# डॉ. जयसिंगराव पवार संपादित ग्रंथांचा उद्या प्रकाशन समारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ शाहू संशोधन केंद्राचे संचालक डॉ. जयसिंगराव पवार यांनी संपादित केलेल्या 'शाहू छत्रपती : राजा आणि क्रांतिकारक व राजर्षी शाहू छत्रपती आणि कोल्हापूरची चळवळ' या ग्रंथांचा प्रकाशन समारंभ शनिवारी (दि.६) सकाळी ११ वाजता मानव्यशास्त्र सभागृह येथे होणार आहे. लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते व कुलगुरु डॉ. डी.टी.शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.